# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १८५ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि. १९ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ०४:०० वा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १८५ वी बैठक (तातडीची) **गुरुवार, दि.१९ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ०४:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे प्रत्यक्ष व Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ऑनलाईन अशा दोन्ही पध्दतीने मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस प्रत्यक्ष व ऑनलाईन पध्दतीने उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १०) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | अनुपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे, प्र. वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | **अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: अधिसभेची ३४ वी बैठक दि.२४ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीची सूचना दि.०५ सप्टेंबर, २०२४ रोजी सर्व सदस्यांना पाठविण्यात आली असून दि.०३ जुलै, २०२३ रोजीच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पत्रानुसार, अधिसभा सदस्यांनी बैठकीसाठी प्रश्न, प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख दि.१३/०९/२०२४ रोजी सायं. ०६:०० पर्यंत होती. त्यानुसार अधिसभा सदस्यांनी अधिसभेच्या बैठकीकरिता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६ (१३) नुसार, व्यवस्थापन परिषद अधिसभेच्या बैठकीत त्यांना द्यावयाची उत्तरे तयार करील.<br>सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | **दि.२४ सप्टेंबर, २०२४ रोजी होणाऱ्या अधिसभेमध्ये सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी खालीलप्रमाणे व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. अजितकुमार बापुराव संगवे | | डॉ. समाधान दिगंबर पवार |
| | प्रश्न १ | साऊथ वेस्ट झोन म्हणजेच दहा राज्याच्या स्पर्धेतून विजयी झालेल्या खेळाडूंची अखिल भारतीय स्पर्धेसाठी निवड होते. ही स्पर्धा राज्य स्पर्धेपेक्षाही अव्वल दर्जाची आहे. असे असताना राज्य स्पर्धेतील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना सन्मान चिन्ह व साऊथ वेस्ट झोन स्पर्धेतील पात्र / विजयी खेळाडूंना सन्मान चिन्ह नाही हा भेदभाव विद्यापीठाच्या क्रीडा विभागाने कशासाठी केला? (घटना: क्रीडा दिन कार्यक्रम) [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] | |
| | प्रश्न: २ | आंतर विद्यापीठ स्पर्धेतील सर्वच खेळाडूंना क्रीडा दिनी ब्लेझर व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यास व्यवस्थापन परिषदेने सर्वानुमते मान्यता दिली. असे असताना त्याच कार्यक्रमात प्रशस्तीपत्रक देण्याचे नियोजन का केले गेले नाही? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] | |
| २) | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | | डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| | प्रश्न: १ | जुलै २०२४ मध्ये झालेल्या पीएचडी कोर्स वर्क पेट-८ परिक्षेमध्ये विद्यार्थी ढोबळे लक्ष्मण कोंडीबा व चोप्रा महेश चंदर यांना बेकायदेशीरपणे विविध सवलती देणाऱ्या विद्यापीठ अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करण्यात आली? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | प्रश्न: २ | राष्ट्रीय विद्यार्थी दिन शासनाच्या नियमानुसार ७ नोव्हेंबर रोजी साजरा करण्याचे निर्देश असताना सदर कार्यक्रम प्रस्तुत विद्यापिठात ९ जुलै २०२४ रोजी साजरा करणाऱ्या विद्यापीठ अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करण्यात आली? [राष्ट्रीय सेवा योजना] | |
| | प्रश्न: ३ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यापीठात झालेल्या सहाय्यक प्राध्यापक (कंत्राटी) भरताना किती अतिरिक्त पदे भरण्यात आली? [आस्थापना विभाग] | |
| ३) | प्रा. डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला | | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे |
| | प्रश्न १ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी विद्यापीठ शिक्षक भरती प्रक्रिया करताना जाहिराती व्यतिरिक्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेशिवाय किती अतिरिक्त पदे भरण्यात आली? [आस्थापना विभाग] | |
| | प्रश्न: २ | विद्यापीठ संलग्नित विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी संख्या वाढ, नैसर्गिक विद्यार्थी वाढ या संदर्भात मान्यतेसाठी आलेली किती प्रकरणे प्रलंबित आहेत? [संलग्नता विभाग] | |
| | प्रश्न: ३ | शैक्षणिक वर्ष २०२१६ पूर्वी प्रवेशित ज्यांना UGC चा N+२ हा नियम लागू होत नाही, अश्या किती विद्यार्थ्यांचे निकाल अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| ४) | प्रा. डॉ. भगवान आदटराव | | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे |
| | प्रश्न १ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी विद्यापीठातील संकुलामध्ये पदवी व पदव्युत्तर वर्गासाठी किती विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे? [पी.जी. प्रवेश विभाग] | |
| | प्रश्न: २ | प्रस्तुत विद्यापीठामध्ये किती विषयाच्या आरएसी समितीवर विद्यापीठ परिक्षेत्रामध्ये मार्गदर्शक उपलब्ध असतानासुध्दा विद्यापीठ परिक्षेत्र बाहेरच्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे? [संशोधन विभाग] | |
| | प्रश्न: ३ | २९ ऑगस्ट २०२४ रोजी विद्यापीठात साजरा झालेल्या क्रीडा दिनानिमित्त किती राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंना ट्रॉफी, रोख रक्कम व ब्लेझर दिले गेले आहेत? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] | |
| ५) | ॲड. उषा नंदकुमार पवार | | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील |
| | प्रश्न १ | प्रस्तुत विद्यापीठामध्ये जून २०१८ ते ऑगस्ट २०२४ पर्यंत प्रत्येक अर्जदारांकडून ऑनलाइन व ऑफलाइन कॉन्व्होकेशनसाठी किती फी घेतली जाते? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | प्रश्न: २ | प्रस्तुत विद्यापीठामध्ये प्राध्यापक पदोन्नतीसाठी प्राप्त प्रस्तावापैकी किती प्रस्ताव प्रलंबित आहेत? [आस्थापना विभाग] | |

| | | |
|---|---|---|
| ६) | डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड | डॉ. सुशिल कुमार शिंदे |
| | प्रश्न १ | प्रस्तुत विद्यापीठात सप्टेंबर २०२३ पासून ऑगस्ट २०२४ पर्यंत विविध महाविद्यालयामध्ये किती स्थानिक चौकशी समित्या विद्यापीठाकडून देण्यात आल्या? [संलग्नता विभाग] |
| | प्रश्न: २ | प्रस्तुत विद्यापीठामध्ये सप्टेंबर २०२३ पासून ऑगस्ट २०२४ पर्यंत विविध संलग्नित महाविद्यालयात शिक्षक भरतीसाठी तसेच पदोन्नतीसाठी किती समित्या विद्यापीठाकडून देण्यात आल्या? [शिक्षक मान्यता विभाग] |
| | प्रश्न: ३ | प्रस्तुत विद्यापीठामध्ये प्राचार्य निवड समिती व CAS अंतर्गत सहयोगी प्राध्यापक तसेच प्राध्यापक निवड समितीमध्ये कुलगुरु नामनिर्देशित सदस्य म्हणून सहाय्यक प्राध्यापकांची निवड केली जाऊ शकते का? [शिक्षक मान्यता विभाग] |
| (७) | श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे |
| | प्रश्न १ | प्रस्तुत विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी घेऊन, पुनर्मुल्यांकनसाठी अर्ज केल्यानंतर त्यांना किती दिवसात पुनर्मुल्यांकन करुन देण्याची तरतूद आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | प्रश्न: २ | विद्यापीठ कायद्यानुसार विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क, प्रवेश शुल्क व इतर विविध शुल्क वाढवण्या संदर्भात कोणते नियम आहेत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | प्रश्न: ३ | प्रस्तुत विद्यापीठात प्रवेशासाठी, पात्रतेसाठी, परीक्षेसाठी कोणकोणते सॉफ्टवेअर सध्या वापरले जात आहेत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| ८) | डॉ. शिरीष विठ्ठल शिंदे | श्री. सचिन मारुती गायकवाड |
| | प्रश्न १ | सप्टेंबर २०२३ ते ऑगस्ट २०२४ पर्यंत च्या कालावधीमध्ये अॅकडमिक कौन्सिल, मॅनेजमेंट कौन्सिल व सिनेटच्या किती बैठका ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आल्या? [सभा व निवडणूका विभाग] |
| | प्रश्न: २ | प्रस्तुत विद्यापीठात झूलॉजी आरएसी, बायोटेक्नॉलॉजी आरएसी, एन्व्हायरमेंटल सायन्स आरएसी चे सदस्य कोण आहेत? [संशोधन विभाग] |
| | प्रश्न: ३ | प्रस्तुत विद्यापीठात विविध अधिकार मंडळाच्या सदस्य नेमणुकी संदर्भातील जाहिरातीनुसार विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या अर्जानुसार अर्जदारांच्या याद्या स्थायी समिती मधील सदस्यांना स्थायी समितीच्या बैठकीच्या सूचनेबरोबर का देण्यात आल्या नाहीत? [सभा व निवडणूका विभाग] |
| ९) | डॉ. राजेंद्र शंकर सुर्यवंशी | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे |
| | प्रश्न १ | विद्यापीठ बृहत आराखडा २०२४ नुसार विद्यापीठ संकुलामध्ये किती अभ्यासक्रम प्रस्तावित आहेत? [संलग्नता विभाग] |
| | प्रश्न: २ | PET २०२४ ची Online परीक्षा घेऊन सुध्दा उद्याप पुढील प्रक्रीया का झाली नाही? [संशोधन विभाग] |
| १०) | प्रा. डॉ नितीन लहानू तळपाडे | डॉ. समाधान दिगंबर पवार |
| | प्रश्न १ | प्रस्तुत विद्यापीठामध्ये १ एप्रिल २०२४ ते ३१ ऑगस्ट २०२४ अखेरपर्यंत Hospitality या शीर्षकांतर्गत किती खर्च करण्यात आला आहे? [वित्त व लेखा विभाग] |
| | प्रश्न: २ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता विद्यापीठामध्ये झालेल्या कंत्राटी प्राध्यापक भरती चौकशी समितीने काय कार्यवाही केली? [आस्थापना विभाग] |
| | प्रश्न: ३ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी विद्यापीठात कंत्राटी प्राध्यापकांची नेमणूक करताना प्रवर्गानिहाय किती जागांची भरती केली आहे? [आस्थापना विभाग] |
| ११) | डॉ. मंगेश मोहन वेदपाठक | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे |
| | प्रश्न १ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यापीठ संकुलातील सर्व विभागांमध्ये कॉन्ट्रॅक्ट बेसिस वर सहाय्यक प्राध्यापकांचे भरती केली गेली. पण काही संकुला मध्ये पात्र उमेदवारांना संधी दिली नाही. त्याची कारणे काय आहेत? [आस्थापना विभाग] |
| | प्रश्न: २ | विद्यापीठाच्या इंक्युबॅशन सेंटरला आत्तापर्यंत किती व कशा प्रकारचा निधी आलेला आहे व त्याचा विनियोग कसा झाला? [इंक्युबेशन सेंटर] |

| | | | |
|---|---|---|---|
| १२) | ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत | | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे |
| | प्रश्न १ | पी.एम.उषा. अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या विविध संकुलांच्या इमारती आणि नुतनिकरन संधर्भात सद्य स्थिती काय आहे? [अभियांत्रिकी विभाग] | |
| | प्रश्न: २ | विद्यापीठाच्या नवीन जागेवरील वनीकरण आणि त्याचे आरक्षण हे कमी करण्यासाठी विद्यापीठाने कोणते प्रयत्न केले आहेत? [अभियांत्रिकी विभाग] | |
| १३) | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | | डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| | प्रश्न १ | विद्यापिठातील सर्व महिला विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांच्या सुरक्षेबद्दल आणि सबलीकरणाबाबत कोणती कार्यवाही केली आहे? [आस्थापना व महिला कक्ष] | |
| १४) | श्रीमती रोहिणी आर. तडवळकर | | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे |
| | प्रश्न १ | विद्यापीठाने प्रवेशा पासून ते निकाला पर्यंत जलद गतीने कार्य करण्यासाठी नवे सॉफ्टवेअर घेतले असताना सुध्दा विविध परीक्षाच्या निकालामध्ये पुन्हा त्याच त्या चुका होऊ लागलेल्या आहेत. त्यांची जबाबदारी निश्चित केली आहे का? त्यांच्यावर काय कारवाई केली आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | प्रश्न: २ | विद्यापीठाची नवीन प्रशाकीय इमारतीचे बांधकामाचे कार्य पूर्ण होऊन ती प्रत्यक्ष उपयोगात कधी येणार? [अभियांत्रिकी विभाग] | |
| १५) | श्री. सुदर्शन मसु यादव | | डॉ. सुशिल कुमार शिंदे |
| | प्रश्न १ | विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालय यांच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यान करिता रोजगार आणि स्वरोजगार या साठी विद्यापीठ पातळीवर कोणते प्रयत्न केले आहेत? [ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग/नवोपक्रम, नवसंशोधन विभाग] | |
| | प्रश्न: २ | विद्यापीठाच्या सर्व संविधानिक अधिकारी यांच्या वाहण वापरण्या बाबत नियमावली व निकष ठरवले आहेत का? [अभियांत्रिकी विभाग] | |
| १६) | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | | श्री. सचिन मारुती गायकवाड |
| | प्रश्न १ | N+२ च्या अगोदरच्या ३१३ विद्यार्थ्यांच्या बाबतीत समिती नियुक्त झाली होती, त्यावर काय निर्णय झाला? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | प्रश्न: २ | विद्यापीठ परिसरातील कंत्राटी शिक्षक आणि प्रशाकीय कर्मचारी यांच्या आरोग्य व अपघात विमा संधर्मात कोणती कार्यवाही केली आहे का? [विद्यार्थी विकास विभाग] | |
| १७) | डॉ. विरभद्र चनबस दंडे | | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे |
| | प्रश्न १ | विद्यापीठ परीक्षेसाठी वापरण्यात येणारे चारचाकी वाहने शै.वर्ष २०२३-२४ या कालावधीत भाडे तत्वार घेतली आहेत का? घेतली जात असतील तर प्रती (मार्च/एप्रिल, ऑक्टोबर/नोव्हेंबर) परीक्षेस या वाहनावर किती खर्च केला गेला? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | प्रश्न: २ | विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांचे २४ जून, २०२४ महाराष्ट्र शासनाच्या CAS बद्दल कोणती प्रक्रिया केली आहे? [आस्थापना विभाग] | |

***

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करुन घेणे या कामासाठी प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देण्याची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या मौजे कोंडी, ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथील परिसरात मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवनचे स्थापत्य बांधकामाचे काम अंतिम टप्यात आहे. त्यानंतर सदर इमारतीमध्ये इंटरनेट कनेक्शन सुविधा उपलब्ध करावी लागणार आहे. सद्यस्थितीत सदर इमारतीमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध नसून त्यासाठी दोन वेगवेगळ्या कंपन्याकडून / Internet Service Provider/ Internet Lease line (ISP/ILL) Primary Internet Speed ५०० MBPS Minimum १:१ dedicated wired internet Speed २०० MBPS minimum (wireless/UBR/lease line) सुविधा उपलब्ध करुन घ्यावे लागणार आहे. त्यासाठी प्रति वर्ष अंदाजे रु.३२,००,०००/- (रुपये बत्तीस लाख फक्त) जीएसटीसह इतका खर्च अपेक्षित आहे. तीन वर्षाकरीता ९६,००,०००/- (रुपये शहाण्णव लाख फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच Internet lease line साठी Next generation firewall हे Device सायबर सुरक्षेसाठी घेणे आवश्यक असून त्यासाठी एकाच वेळी रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख) जीएसटी सह इतका खर्च अपेक्षित आहे. सदर दोन्ही कामासाठी एकूण रुपये १,०६,००,०००/- (रुपये एक कोटी सहा लाख फक्त) तीन वर्षाकरीता खर्च अपेक्षित आहे.<br>सबब, मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करुन घेणे या कामासाठी प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देण्याची बाब विचारार्थ. | माहिती तंत्रज्ञान विभाग |
| ठराव: | **मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करुन घेणे या तीन वर्षाच्या कामासाठी रु.१,०६,००,०००/- (रुपये एक कोटी सहा लाख फक्त) इतक्या खर्चास व सदरची प्रक्रिया नियमानुसार इ-निविदाद्वारे करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच सदर विषयासंदर्भात व्यवस्थापन परिषदेच्या दि.०२/०२/२०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.५(१) सर्वानुमते रद्द करण्यात आला.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [३(१)] | **विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह ब्लॉक 'ब ' करिता बेडशीट, पिलोकव्हर, टॉवेल, नॅपकीन चादर, सर्व खिडक्यांना पडदे बसविणे, पिण्याच्या पाण्याच्या सोईसाठी वॉटर प्युरिफायर मशीन व वॉटर कुलर खरेदी करण्याचे काम सोलापूर स्थानिक बाजारपेठेतून हस्तपोहोच दरपत्रके घेऊन करण्याची बाब विचारार्थ.** | अभियांत्रिकी विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाकडील कौशल्य विकास केंद्र आणि महाराष्ट्र राज्य विद्याशाखा विकास प्रबोधिनी (Maharashtra state faculty Development Academy) यांच्या समवेत विविध कौशल्याधारित प्रशिक्षण देण्यासंदर्भात सामंजस्य करार (MoU) करण्यात आलेला आहे. या करारानुसार महाराष्ट्रातील विविध विद्यापीठ, महाविद्यालयातील शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांना कौशल्याधारित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यासाठी दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ ते दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत ५ दिवसीय अल्पकालीन अभ्यासक्रम (Short Term Courses) Faculty Development Programme (FDP) चे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणकरिता अंदाजे ४५ प्रशिक्षणार्थी उपस्थित राहणार आहेत. त्यापैकी ३६ प्रशिक्षणार्थींची निवासाची सोय आंतरराष्ट्रीय मुलांचे वसतिगृह ब्लॉक 'ब' येथील खोल्यांमध्ये करावयाची आहे. सदर प्रशिक्षणार्थींच्या निवास व्यवस्थेच्या अनुषंगाने विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह ब्लॉक 'ब' करिता बेडशीट, पिलोकव्हर, टॉवेल, नॅपकीन चादर खरेदी करणे, सर्व खिडक्यांना पडदे बसविणे, पिण्याच्या पाण्याच्या सोईसाठी वॉटर प्युरिफायर मशीन व वॉटर कुलर खरेदी करुन बसविणेचे काम करावयाचे आहे. सदर काम नियमाप्रमाणे दरपत्रके मागवून करण्यास विलंब होणार आहे. त्यामुळे या कामाची तातडी पाहता खास बाब म्हणून सोलापूर स्थानिक बाजारपेठेतून हस्तपोहोच दरपत्रके घेऊन सदरचे काम करावे लागणार आहे.

उपरोक्त कामाच्या अनुषंगाने डॉ.ए.ए.घनवट, डॉ.ए.आर.शिंदे व डॉ.जे.डी. माशाळे या त्रिसदस्यीय समितीने खालीलप्रमाणे अहवाल दिलेला आहे.

१) बेडशीट पिलोकव्हर सहीत (१ जोडी)

| Sr. No | Description | Qty | प्रति नग अंदाजे किंमत रुपये | एकूण नग अंदाजे किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | Premium cotton around 210 TC 145cms 225cms white Bombay dyeing similar cloth with full size 1 pillow cover set, bed sheet. | ७२ जोडी | ४४०/- | ३१,६८०/- |
| २ | Handloom cotton casement coloured bed sheet with border 144*224 cms with 1 pillow cover full size. | ७२ जोडी | ३९०/- | २८,०८०/- |

वरील तक्त्यात नमुद तपशीलाप्रमाणे बेडशीट पिलोकव्हर सहीत खरेदी करण्यास अंदाजे एकूण रुपये ३१,६८० किंवा रुपये २८,०८०/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

२) टॉवेल नॅपकीन सहीत (१ जोडी)

| Sr. No | Description | Qty | प्रति नग अंदाजे किंमत रुपये | एकूण नग अंदाजे किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | Supply of heavy quality premium cotton 600 GSM white Turkish towel with about 80 GSM napkin full size. | ३६ जोडी | ४४०/- | १५,८४०/- |

वरील तक्त्यात नमुद तपशीलाप्रमाणे टॉवेल नॅपकीन सहीत खरेदी करण्यास अंदाजे एकूण रुपये १५,८४०/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

३) चादर

| Sr. No | Description | Qty | प्रति नग अंदाजे किंमत रुपये | एकूण नग अंदाजे किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | Premium quality full figure mayurpankh jacquard Solapur chaddar Size 60*90 heavy weight. | ३६ नग | ४२०/- | १५,१२०/- |

वरील तक्त्यात नमुद तपशीलाप्रमाणे चादर खरेदी करण्यास अंदाजे एकूण रुपये १५,१२०/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

४) पडदे

| Sr. No | Description | Qty | प्रति Sq.Mt / R.mt अंदाजे किंमत रुपये | अंदाजे एकूण किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | Heavy quality curtain cloth make JSM brand washable in modern eyelet pattern with heavy quality accessories and original quality with tape hole Patti and fixing Tape stitching quality is of heavy ring colour ivory for 21 windows in the rooms and Corridors. | २०० Sq.Mtr | २१५/- | ४३,०००/- |
| २ | Heavy india make finials with heavy weight 25mm rod which including support installation and drapery with end designer end balls also with all the necessary accessories transport etc in heavy SS finish heavy weight. | ४२ R.Mt | ४२५/- | १७,८५०/- |

वरील तक्त्यात नमुद तपशीलाप्रमाणे खिडक्यांना पडदे व रॉड बसविण्यास अंदाजे एकूण रुपये ४३,००० /- व १७,८५०/- रुपये इतका खर्च होणार आहे.

५) वॉटर प्युरिफायर

Commercial RO Plant

| | |
|---|---|
| Capacity Out Put | 50 Ltr Per hour |
| Jambo skid powder coted | |
| Pump liffo | 300 gpd -1 |
| Pump liffo | 100 gpd -1 |
| 4 (RO Membren) | Pure touch 80 gpd membren |
| Warranty | One Year |
| Installation | Free |
| Cut of Sensor | Free for Water Cooler |
| Carbon Filter Taste inhanser | |
| Volt | 24 Volt DC Solvnide Valve |
| | 24 Volt DC SMPS |
| Approx. Cost | 28,000/- |

वरील तक्त्यात नमुद तपशीलाप्रमाणे १ नग वॉटर प्युरिफायर मशीन खरेदी करुन बसविण्यासाठी अंदाजे रुपये २८,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

| ६) वॉटर कुलर | |
|---|---|
| Material | Pure SS |
| DC | 60 |
| Storage Capacity | 60 Ltr |
| Temperature Range | 0 to 25 $^{0C}$ |
| Compressor Type | Reciprocating |
| Front Panel | SS 304 |
| Food grade | |
| Approx. Cost | 34,500/- |

वरील तक्त्यात नमुदप्रमाणे विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह ब्लॉक ब करिता १) बेडशीट पिलोकव्हर सहीत ७२ नग रुपये ३१,६८०/- किंवा रुपये २८,०८०/- २) टॉवेल नॅपकीन सहीत ३६ नग रुपये १५,८४०/- ३) चादर ३६ नग रुपये १५,१२०/- ४) सर्व खिडक्यांना पडदे बसविणे रुपये ४३,०००- व रुपये १७,८५०/- ५) वॉटर प्युरिफायर रुपये २८,०००/- ६) वॉटर कुलर रुपये ३४,५००/- रुपये इतका खर्च अपेक्षीत आहे.

सबब, विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह ब्लॉक ब करिता बेडशीट, पिलोकव्हर, टॉवेल, नॅपकीन चादर, सर्व खिडक्यांना पडदे बसविणे, पिण्याच्या पाण्याच्या सोईसाठी वॉटर प्युरिफायर मशीन व वॉटर कुलर खरेदी काम सोलापूर स्थानिक बाजारपेठेतून हस्तपोहोच दरपत्रके घेऊन करण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह ब्लॉक 'ब ' करिता बेडशीट, पिलोकव्हर, टॉवेल, नॅपकीन चादर, सर्व खिडक्यांना पडदे बसविणे, पिण्याच्या पाण्याच्या सोईसाठी वॉटर प्युरिफायर मशीन व वॉटर कुलर खरेदी करण्याचे काम सोलापूर स्थानिक बाजारपेठेतून हस्तपोहोच दरपत्रके घेऊन पुढील प्रक्रिया करण्यास व येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [३(२)] | **संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाची जाहीरात प्रसिध्द करण्याची बाब विचारार्थ सादर.**<br>टिपणी: संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या रिक्त पदाची जाहिरात जाहिरात दै. लोकमतच्या दि. ०६/०३/२०२४ रोजीच्या, दै. टाईम्स ऑफ इंडियाच्या दि.०६/०३/२०२४ रोजीच्या, दै. लोकसत्ता (एक्सप्रेस करिअर वेस्ट पॅकेज) च्या दि.०८/०३/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, युनिव्हर्सिटी न्युजच्या दि. ११-१७ मार्च २०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये तसेच विद्यापीठाच्याव महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन आवेदनपत्र सादर करण्याची अंतिम मुदत दि.१०/०४/२०२४ पर्यंत होती.<br>उक्त नमूद जाहिरातीस अनुसरुन प्राप्त आवेदन पत्रावर विहित कार्यवाही करुन सदर पदाकरीता पात्र ठरलेल्या पाच (०५) उमेदवारांची मुलाखत (निवड समिती बैठक) दि.१८/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद बैठक कक्ष, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर निवड समितीच्या बैठकीस निवड समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य उपस्थित होते.<br>सदर मुलाखतीकरीता खालील पाच पात्र उमेद्वारांना बोलविण्यात आलेले होते.<br>१) डॉ. अरळेलीमठ विजयानंद रेवणसिध्दय्या<br>२) डॉ. जाधव हिमत तुकाराम<br>३) डॉ. जगदे शेखर मल्लिकार्जुन<br>४) डॉ. सोनगे बसगोंडा कल्लप्पा<br>५) डॉ. पाटील साहेबराव नरसिंगराव<br>उपरोक्त नमूद पाचही उमेदवार मुलाखतीकरीता उपस्थित होते व त्यांची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०५ (२) नुसार गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने मुलाखत घेऊन त्यांचा अहवाल सादर केलेला असून निवड समितीने संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदासाठी कोणत्याही उमेदवाराची शिफारस केलेली नसून No candidate found suitable असा शेरा दिलेला आहे.<br>संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाकरीता गठीत निवड समितीने दिलेला अहवाल विचारात घेता, सदर पदाकरीता कोणत्याही उमेदवाराची निवड केली नसल्याने कोणालाही नियुक्ती आदेश देण्यात आले नाही. तसेच सदर पदभरती करणेकामी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यापूर्वीच दि. ०३/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी प्रदान केल्याने सदर पदाची फेरजाहीरात प्रसिध्द करावी लागणार आहे.<br>सबब, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाची जाहीरात प्रसिध्द करण्याची बाब विचारार्थ सादर. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाची फेर जाहिरात प्रसिध्द करण्यास व येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद